
# ३. आम्हांलाही हवाय मोबाईल !



माझं एकदा ऐक ना आई. मी आता मोठी झाले, असं तूच नाही का म्हणालीस? मग मलाही सगळ्यांसारखा एक छान मोबाईल फोन पाहिजे की नाही? कशासाठी म्हणजे काय ? बोलण्यासाठीच ना असतो फोन? वा...! गम्मतच आहे. ताईने मागितला, की लगेच मिळतो फोन. दादा तर कॉलेजलासुद्‌धा नेतो त्याचा मोबाईल. बाबांकडे दोन-दोन मोबाईल असतात अन् आम्ही मागितला तर म्हणे गरज काय त्याची ?

ए... तायडे, उगीचच काहीही बोलू नकोस हं. तुला मोबाईल मिळाला, तेव्हा मी काही बोलले होते का ? हो, हो. आम्हांलाही महत्त्वाची कामं असतात, महत्त्वाचं बोलायचं असतं. दादाचा फोन घेते मी कधीकधी, पण फक्त गेम्स खेळण्यासाठीच गं. बोलण्यासाठी काय करावं मग?

आई, पुढल्या महिन्यात माझा वाढदिवस येतोय. मित्रमैत्रिणींना पार्टीसाठी बोलवायला किती मजा येईल ! 'अरे ! उद्या संध्याकाळी माझी बर्थडे पार्टी घरीच आहे गच्चीवर. तू जरा लवकर येशील ना ? गुड. अगं, खूप धमाल करू ! हो, सगळ्यांना आता फोनवरच सांगतेय. बाय.'

वाव ! किती मस्त वाटेल असे फोन करताना. आई, अगं शाळेत अचानक सुट्टी घ्यावी लागली, तर उगीच बोलणी ऐकावी लागतात सरांची. त्यापेक्षा पपा कसे घरातूनच ऑफिसला फोन करतात, तसा सरांना शाळेत फोन करायचा. 'हॅलो... गुड मॉर्निंग सर, मला आजची सुट्टी मिळेल का ? जरा महत्त्वाचं काम आहे घरी. हो सर, उद्या नक्की येणार शाळेत. थँक्यू सर.'

खूप कामं करता येतात अशी. तू सांग ना बाबांना. ताईच्या वेळी नाही का तूच सांगितलंस बाबांना. ताई तुझी लाडकी आणि मी काय दोडकी आहे का गं ? आता तुझ्याकडे नसला म्हणून काय मलाही नको का मोबाईल? अगं, माझा मोबाईल आला, की तो आपण दोघीमिळून वापरू. नक्की. आजी... तू नको आईला रागावूस. काय म्हणतेस? तुम्हा मुलांना मोबाईलवर किती वेळ बोलावं याचं भानच नसतं. अगं, मोबाईल फोनमुळे कोणालाही संपर्क करता येतो. दादा तर सारखं मित्रांना सांगतो, 'अरे, मी ग्रंथालयात अभ्यास करतोय.' तू म्हणतेस ते खरं, पण मोठी माणसं करतात असं. आम्ही मुलं नाही करणार. देऊन तर बघा आधी मोबाईल आमच्या हातात. पपांना तर सांग. बघू काय होतंय ते !

**– सूर्यकांत सराफ**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून नाट्यछटा वाचून घ्यावी. दिवाकरांच्या नाट्यछटा मिळवून त्या साभिनय सादर करण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.